दहशतवाद प्रतिरोध विषयक भारत-उझबेकिस्तान संयुक्त कार्यगटाची 10 वी बैठक

दहशतवादविरोधी भारत-उझबेकिस्तान संयुक्त कार्यगटाची 10 वी बैठक नवी दिल्ली येथे 22 ऑक्टोबर 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे सह-अध्यक्षपद डॉ. सुहेल अजाज खान (परराष्ट्र मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव, दहशतवादविरोधी विभाग) आणि श्री. पिरिमकुलोव्ह गुलोमजोन शोव्होनकुलोविच (उझबेकिस्तान परराष्ट्र मंत्रालय अंतर्गत दक्षिण आशियाई, निकट पूर्व, मध्य पूर्व आणि आफ्रिकी देशांसोबतच्या सहकार्य विभागाचे प्रमुख) यांनी भूषविले.

2. उभय बाजूंनी जागतिक स्तरावर आणि त्यांच्या संबंधित प्रदेशांमध्ये दहशतवादी गटांनी उद्भवलेल्या धोक्यांवर चर्चा केली. उभय बाजूंनी दहशतवादविरोधी सध्याच्या आणि उदयोन्मुख आव्हानांवर विचारांचे आदान-प्रदान केले. ज्यामध्ये अतिरेकी आणि कट्टरवादाचा सामना करणे, दहशतवादाला वित्तपुरवठा रोखणे, दहशतवादी हेतूंसाठी तंत्रज्ञानाचा वापर रोखणे आणि आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी आणि दहशतवाद यांच्यातील संबंध यांचा समावेश होता. राष्ट्रीय आणि प्रादेशिक सुरक्षेसाठी असलेल्या धोके आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी सहकार्य करण्यास आणि दहशतवाद प्रतिरोध विषयक भारत-उझबेकिस्तान संयुक्त कार्यगटाच्या चौकटीला अधिक मजबूत करण्यास उभय बाजूंनी सहमती दर्शविली.

3. माहिती सामायिकरण, क्षमता निर्माण आणि सर्वोत्तम पद्धती सामायिक करून दहशतवाद प्रतिरोध क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्याच्या उपाययोजनांवर उभय बाजूंनी चर्चा केली. त्यांनी भारत आणि उझबेकिस्तानच्या संबंधित एजन्सी दरम्यान दहशतवादाविरुद्धच्या लढाईत सहकार्य विकसित करण्याच्या शक्यतांवर चर्चा केली. UN, SCO-RATS आणि EAG सारख्या बहुपक्षीय मंचांवर सहकार्य बळकट करण्यासाठी उभय बाजूंनी वचनबद्धतेची पुष्टी केली..

4. संयुक्त कार्यगटाची पुढील बैठक उझबेकिस्तानमध्ये परस्पर-सोयीस्कर तारखेला आयोजित केली जाईल.

नवी दिल्ली

22 ऑक्टोबर 2026